## दीपनगर येथे प्रजासत्ताक दिन संपन्न



श्री.व्ही.एस. पाटील ध्वजारोहण करताना

भुसावळ औ.वि. केंद्र, महानिर्मिती कंपीनच्या शक्तीगड कार्यालयात दिनांक २६ जानेवारी, २००९ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रीय ध्वजारोहण, माननीय मुख्य महाव्यवस्थापक श्री.व्ही.एस. पाटील यांचे शुभहस्ते करण्यात आले. तसेच नविन क्लब दीपनगर येथे सर्व दीपनगर वासीयांसोबत त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी स्वागतगीत व देशभक्तीपर गीत, अभिरूची महिला मंडळ व समूह, शाखा दीपगनर, यांनी सादर केले. तसेच आपल्या भाषणात मुख्य महाव्यवस्थापकांनी नविन पिढी विद्यार्थी, विद्यार्थीनीना संबोधित केले की, २६ नोव्हेंबर, २००८ च्या हल्यानंतर भारतीय नागरिक अजून अखंड झालेला आहे. त्यांचे मनोबल खचलेले नाही. ते कुठल्याही परिस्थितीवर मात करण्यास सज्ज झालेले आहेत. आपल्यासमोर बसलेल्या विद्यार्थ्यापैकी कुणी भारतीय सेनेतील जवान, कुणी डॉक्टर, इंजिनीअर तर कुणी पोलीस अधीक्षक बनु शकतो. तेव्हा या विद्यार्थ्यावर देशाचे भवितव्य अवलंबून आहे. याप्रसंगी असे आवाहन करण्यात आले की देशाचे संरक्षण करण्यास नविन पिढीने पुढे यावे व आपल्या भारत मातेचे संरक्षण करावे. दीपनगर परिसरातील शालेय विद्यार्थी, पोलीस व सुरक्षा रक्षक यांनी सलामी दिली. सुरक्षा विभागांनी आग लागल्यास त्यावर प्रतिबंधित उपाय काय





करावे व पीडीत लोकांना कसे वाचवावे यांचे प्रात्यक्षिके दाखविण्यात आले. तसेच अभिरूची महिला मंडळ यांनी ''कचऱ्यातून कला'' प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले व तसेच विविध पुस्तक प्रदर्शनी सुद्धा ठेवण्यात आली. या सर्व गोष्टींचा दीपनगर वासीयांनी भरपूर लाभ घेतला.

शालेय विद्यार्थी व दीपनगर येथील अधिकारी कर्मचारी यांनी मिरविणुकीत भाग घेतला. त्यांत विविधतेत एकता अशी झलक दाखविण्यात आली. शारदा माध्यमिक विद्यालय दीपनगर, येथील मुख्याध्यापक व शिक्षण यांच्या सहकार्याने रॅली फार शिस्तबद्ध झाली.

वरील कार्यक्रमास श्री.व्ही.एस. पाटील मुख्य महाव्यवस्थापक (नि.) श्री.जी.आर. पाटील मुख्य महाव्यवस्थापक (प्रकल्प), महाव्यवस्थापक श्री.गट्टेवार, श्री.गौर, श्री.देवतारे, अधीक्षक अभियंते श्री.खाडीलकर, श्री.बुरडे, श्री.जाधव, श्री.चंद्रागडे, श्री.सी.आर.पाटील,श्री.खोब्रागडे सर्व विभाग प्रमुख तसेच सर्व संघटना प्रतिनिधी व वसाहतीतील रहिवासी, विशेषता महिलावर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

## दीपनगर येथे सार्वजनिक शिव जयंती उत्सव



दीपनगर नविन क्लब, येथे दिनांक १९.०२.२००९ रोजी सकाळी ०८.३० वाजता मुख्य महाव्यवस्थापक श्री.व्ही.एस. पाटील यांच्या शुभ हस्ते राजे छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले व त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रसिद्ध प्रबोधनकार श्री.दादासाहेब दुर्गादास नेवे यांचे शिवचरित्रांवर मार्गदर्शनपर भाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणात श्री.शिवाजी महाराज यांच्या विशिष्ट पैलूचे वर्णन तसेच त्यांचे गुण तरूण पिढीने आत्मसात करावे असे आव्हान केले. अध्यक्षीय भाषणात मुख्य महाव्यवस्थापक (नि.) श्री.व्ही.एस. पाटील यांनी या थोर महापुरूषाची जयंती आपण सदैव साजरी करायला पाहिजे व त्यांचे आचार विचार नविन पिढी पर्यंत पोहचविण्याचे कार्य करावे असे आवाहन केले.

सायंकाळी ०४.०० वाजता राजे छत्रपती श्री.शिावाजी महाराज यांच्या प्रतिमेची सवाद्य भव्य मिरवणूक काढण्यात आली. यात विशेष आकर्षण श्री.जय बजरंग व्यायामशाळा कुंभारी शाखा-वाडेगांव यांचा फिरता कवायती कार्यक्रम करण्यात आला.

पॉवर हेल्थ क्लब, दीपनगर यांचे सौजन्याने शरीर सौष्ठव स्पर्धा, दीपनगर सार्वजनिक शिवजंयती उत्सव समिती तर्फे जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. वरील सामने बघतांना कामगार व रहिवाश्यांनी खुप आनंद लुटला. शिवजयंतीचे निमित्त साधून कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना कल्याण मंडळाची शिष्यवृतीची रक्कम धनादेशाद्वारे देण्यात येऊन त्यांच्या पालकाना सुद्धा गौरविण्यात आले.

वरील कार्यक्रमास श्री.व्ही.एस. पाटील मुख्य महाव्यवस्थापक (नि.), श्री.जी.आर. पाटील मुख्य महाव्यवस्थापक (प्रकल्प), महाव्यवस्थापक श्री.गट्टेवार, श्री.गौर, श्री.देवतारे, अधीक्षक अभियंते श्री.खाडीलकर, श्री.बुरडे, श्री.जाधव, श्री.चंद्रागडे, श्री.सी.आर. पाटील, श्री.खोब्रागडे, सर्व विभाग प्रमुख तसेच सर्व संघटना प्रतिनिधी, उत्सव समिती कार्यकारिणी व सभासद व वसाहतीतील रहिवासी, महिलावर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.